MHSO130003202002

## निशाणी क्र. १५७ वरील आदेश

वादी यांनी त्यांच्या विरुध्द झालेला उलटपास नाहीचा आदेश रद्द होऊन त्यांना उलटतपास घेण्याची परवानगी मिळावी म्हणून सदरचा अर्ज दाखल केला आहे. त्यांचे म्हणणे असे आहे की, वादीच्या वकिलांनी अनवधाने प्रतिवादी क्र.६ यांचा उलटतपास घेणेकामी हजर राहता आले नाही. त्यामुळे त्यांच्या विरुध्द उलटतपास नाहीचा आदेश पारित करण्यात आला आहे. त्यामुळे वादी यांनी त्यांना न्यायाच्या दृष्टीने उलटतपास घेण्याची संधी मिळावी व त्यांच्या विरुध्द झालेला उलटतपास नाहीचा आदेश रद्द करावा अशी विनंती केली आहे.

०२. सदर अर्जास प्रतिवादी क्र.६ यांनी म्हणणे दिले असून त्यामध्ये त्यांनी प्रतिवादीचा अर्ज खरा नाही तसेच वादीने दिनांक २८/०२/२०२४ रोजीच सरतपासाची प्रत घेतल्याचे कथन केले आहे. त्यामुळे अर्जातील कारण खोटे असुन त्यांचा अर्ज नामंजूर करण्यात यावा अशी विनंती केली.

०३. दोन्ही पक्षांना ऐकले. अभिलेखावरील उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन केले. प्रतिवादी क्र.६ यांनी त्यांचे सरतपासाचे शपथपत्र दिनांक २८/०२/२०२४ रोजी दाखल केले. त्यानंतर वादींना उलटतपास घेण्यास पुरेशी मुदत दिली असल्याचे दिसून येते. त्यानंतर दिनांक १०/०६/२०२४ रोजीही वादीचे विधीज्ञ गैरहजर राहिले व त्यांच्या विरुध्द उलटतपास नाहीचा आदेश पारित करण्यात आला आहे. जरी असे असले तरी, वादींनी सदरचा दावा प्रतिवादींविरुध्द दावा मिळकतीचे वाटणी मिळणेसाठी दाखल केला आहे. त्यामुळे त्यांचे म्हणणे ऐकणे न्यायाच्या दृष्टीने योग्य होईल असे वाटते. तसेच वादी यांना उलटतपासाची संधी दिल्यास सदर दाव्याचा गुणदोषांवर निकाल होण्यास मदतच होणार आहे. वादी यांनी जरी उलटतपास घेण्यास दिरंगाई केली असली तरी त्यांच्यावर

योग्य तो खर्च आकारुन सदरची दिरंगाई भरुन काढता येईल. सदर बाबत वादी यांच्यावर रक्कम रुपये २००/- इतका खर्च आकारुन व तो प्रतिवादी क्र.६ यांना देणे योग्य होईल. सबब वादी यांचा सदरचा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. म्हणून वादी यांचा अर्ज निशाणी क्र.१५७ मंजूर करण्यात येतो व त्यांना आदेशीत करण्यात येते की त्यांनी पुढील तारखेपर्यंत खर्चाची रक्क्म रुपये २००/- प्रतिवादी क्र.६ यांना द्यावी व प्रतिवादी क्र.६ यांचा पुढील तारखेस उलटतपास घ्यावा.

Digitally signed by SANTOSH BHOLARAM VIJAYKAR
Date: 2024.07.23 17:35:37 +0530

बार्शी
दिनांक २३/०७/२०२४.

(एस.बी. विजयकर)
सह. दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
बार्शी.

## C E R T I F I C A T E

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment / Order

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of the Stenographer | : | Shri.S.R. Barangule |
| (b) | Court | : | Shri.S.B. Vijaykar,<br>Jt.C.J.J.D.&J.M.F.C.<br>Barshi. |
| (c) | Judgment /Order declared on | : | 23/07/2024 |
| (d) | Judgment /Order signed by P.O. on | : | 23/07/2024 |
| (e) | Judgment /Order uploaded on | : | 23/07/2024 |